## शुक्रवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०१६

नाट्यदिंडीचे मुख्य रंगमंचावर आगमन झाल्यानंतर सायं. ७.०० वाजता शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते ९६ व्या नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षा होत्या श्रीमती फैयाज शेख आणि स्वागताध्यक्ष होते मा. ना. श्री. एकनाथ शिंदे. त्यानंतर नियोजित संमेलनाध्यक्ष मा. श्री. गंगाराम गवाणकर यांच्याकडे संमेलनाध्यक्ष पदाची सूत्रे सोपविण्यात आली.

दु. ४.०० वाजता 'बुद्धम् शरणम्' हा कार्यक्रम रंगकर्मी अशोक साठे रंगमंचावर (डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे) येथे व उद्घाटनानंतर 'शिवसोहळा' हे शिवाजी महाराजांच्या जीवनावरील महानाट्य नंदेश उमप यांनी सादर केले.

## शनिवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१६

पहाटे ६.०० वाजता, मासुंदा तरंगमंच (तलाव पाळी), ठाणे येथे श्री. सुबोध भावे व महेश काळे यांचा 'सूर निरागस होवो' नाट्यसंगीताचा कार्यक्रम व सायंकाळी ५.०० वाजता विविध कलाविष्कार सादर करण्यात आले. स. ९.०० वाजता नाटककार शाम फडके रंगमंच (राम गणेश गडकरी रंगायतन ठाणे) येथे तीन बालनाट्ये दु. ४.०० वाजता संमेलनाध्यक्ष श्री. गंगाराम गवाणकर यांची मुलाखत आणि 'चित्रांगदा' हे नवीन नाटक सादर करण्यात आले. मुख्य रंगमंचावर स. ९.३० वाजता 'आमची बोली आमचा बाणा', स. ११.३० वाजता 'परिसंवाद' नाट्य व्यवसायाची "इंडस्ट्री" कशी होणार ?' दु. ३.०० वाजता 'मराठी रंगभूमीचा पूर्वरंग - चित्रकथी, कळसूत्री बाहुल्या, दशावतार, भारूड, पोवाडे आणि पारंपारिक लावण्या', सायं. ५.०० वाजता परिसंवाद - 'नाटकाचे माध्यमांतर काय हरवतं काय गवसतं' व सायं. ६.३० वाजता 'कलारजनी' सादर करण्यात आली. रंगकर्मी अशोक साठे रंगमंच येथे स. ९.३० वाजता एकांकिका व सायं. ५.०० वाजता 'स्पिरीट' (नाटक), स. १० ते दु. १.०० वा. रंगकर्मी दिलीप पातकर रंगमंच (डॉ. काशिनाथ घाणेकर मिनी थिएटर) येथे नाट्य परिषदेच्या शाखांचे विविध कार्यक्रम व दु. ४.३० वाजता 'तुझ्या सवे तुझ्या विना' (नाटक), स. १० ते दु. ४ वाजेपर्यंत अभिनेते शशी जोशी रंगमंच (टाऊन हॉल) येथे एकपात्री आविष्कार सादर करण्यात आले.

## रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६

दादोजी क्रिडांगण प्याव्हेलीयन येथे स. १०.३० वाजता विषय नियामक समितीची सभा घेण्यात आली.

स. ६.०० वाजता मासुंदा तरंगमंच येथे 'विठ्ठल विठ्ठल' हा शौनक अभिषेकी व मंजुषा पाटील-कुलकर्णी यांचा संगीताचा कार्यक्रम व सायं. ५.०० 'विविध कलाविष्कार' हे कार्यक्रम सादर करण्यात आले. स. ९.३० वाजता नाटककार शाम फडके रंगमंच येथे 'भरारी-कर्णबंधीर मुलांचा नाट्यविष्कार व वंचितांचा रंगमंच' या पारितोषिक विजेत्या तीन नाटीका, दु. ४.३० वाजता विविध शाखांचे कार्यक्रम आणि रात्रौ ८.३० वाजता 'लग्नाची बेडी' (नाटक), स. १०.०० वाजता अशोक साठे रंगमंच येथे 'बंद भाव कळ्यांचे' (दीर्घांक), स. ११.३० वाजता 'सखी ग सखी' (दीर्घांक), दिलीप पातकर रंगमंच येथे सकाळी १०.०० वाजता पारितोषिक विजेत्या एकांकिका, मुख्य रंगमंचावर स. ९.३० वाजता अभिनेते शरद पोक्षे यांच्याशी मुक्त संवाद, स. ११.३० वाजता 'परिसंवाद'- गेला तरूण प्रेक्षक कुणीकडे', दु. २.०० वाजता 'वारसा असा लाभला' शाहिर साबळे ॲकॅडमीचा कार्यक्रम, दु. ४.०० वाजता 'खुले अधिवेशन', सायं. ५.०० वाजता ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा समारोप सन्माननीय प्रमुख पाहुणे मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्ष होते मा. श्री. गंगाराम गवाणकर. सायं. ७.०० वाजता नाट्य परिषद रजनी हा विविध रंगकर्मींचा सहभाग असलेला कार्यक्रम सादर करण्यात आला.